# मा. मंत्री (वित्त) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी बुधवार, दिनांक १८ मार्च २०१५ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

भाग—१

## ❖ शासनाची प्राथमिकता

- कोरडवाहू शेतीस स्थैर्य देणे, पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करणे, विषमता दूर करणे, वाढत्या शहरीकरणाच्या आवाहनास समर्थपणे सामोरे जाणे व तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे या गोष्टीवर भर.
- महसूली संकलन साधणे आणि भांडवली खर्च अधिक परिणामकारक व्हावा यासाठी कठोर उपाययोजनांचे सूतोवाच.
- शेतीसाठी प्रस्तावित केलेल्या विविध योजना, उद्योग व व्यापारासाठी पोषक वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा, शासकीय निधीचा परिणामकारक विनियोग आणि एकंदरीत चोख आर्थिक व्यवस्थापन यामुळे दोन अंकी विकास दर गाठण्याचा शासनाला विश्वास.
- शेती विकासाचा दर ६ टक्के च्या वर नेण्याचा शासनाला विश्वास.

## ❖ सावकारी कर्जमुक्ती

- मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी रु. १७१ कोटींची तरतूद. दोन लाख शेतकऱ्यांना योजनेचा फायदा.

## ❖ शेतीविषयक योजना

- जलयुक्त शिवार अभियानासाठी रु.१००० कोटी, सिमेंट नाला बांध कार्यक्रमासाठी रु.५०० कोटी, विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी रु. १०० कोटी निधीची तरतूद.
- सूक्ष्म सिंचनाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी रु.३३० कोटीची तरतूद.
- शेतकऱ्यांच्या आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यासाठी नवीन “मोतीरामजी लहाने कृषि समृध्दी योजना” ही नवीन योजना याद्वारे कृषि यांत्रिकीकरण व कृषि क्षेत्रातील अन्य योजनांचे एकत्रीकरण व त्याद्वारे शेतीची उत्पादकता वाढविण्यावर भर.
- राज्य रोजगार हमी योजनेसाठी रु.७०० कोटी तर महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी रु.१,९४८.८० कोटी.
- राष्ट्रीय कृषि योजनेसाठी रु. ३३६ कोटी व राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान व फलोत्पान अभियानासाठी रु. २५७ कोटी.

❖ **सिंचन**

- सिंचन प्रकल्पाचे अचूक तांत्रिक व वित्तीय नियोजन करुन प्रकल्प अमंलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम राबविण्यासाठी जलसंपदा विभागास रु. ७२७२ कोटींचा निधी.

❖ **रस्ते विकास**

- ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी "मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना" सुरु करण्याची घोषणा. त्यासाठी ३०० कोटी रुपयांचा नियतव्यय व योजनेची प्रगती पाहून प्रतिवर्षी १००० कोटी पर्यंत भरीव निधी.
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रु.७९० कोटी तसेच या योजनेअंतर्गत प्रशासकीय खर्च व भाववाढीच्या निकषात न बसणाऱ्या कामांसाठी रु. ७१ कोटी असा एकूण रु.८६१ कोटी नियतव्यय.
- ५००० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या कामांची सुधारणा करण्याचे उद्दिष्ट व त्यासाठी रु.३२१३ कोटी नियतव्यय.
- "आमदार आदर्श गाव योजना" या नवीन योजनेची घोषणा.

❖ **विद्युत**

- वीज निर्मिती प्रकल्पांसाठी रु. ५३५.३४ कोटी.
- वीज वितरण प्रणालीची क्षमता वाढविण्यासाठी "पायाभूत आराखडा-२" या योजनेसाठी रु ५३८.८३ कोटी.
- जलविद्युत प्रकल्पांसाठी रु ९०० कोटी.

❖ **दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी घरकूल योजना**

- दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना स्वतःची जागा खरेदीसाठी आर्थिक सहाय्याची "पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" या योजनेखाली रु. ५०,००० पर्यंत अर्थ सहाय्य. योजनेसाठी रु. २०० कोटी नियतव्यय.
- घरकुल योजनेंतर्गत १,००,००० घरे बांधण्याचे शासनाचे लक्ष्य व त्यासाठी रु. ८८४.४६ कोटी तरतूद.

❖ **स्वच्छ भारत अभियान**

- स्वच्छ भारत अभियानासाठी रु. ८१० कोटी.

❖ **पायाभूत सुविधा**

- मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पासाठी रु. १०९.६० कोटी, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी रु.१९७.६५ कोटी व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी रु. १७४.९९ कोटीचा निधी.
- स्मार्ट सिटीज योजनेसाठी रु. २६८ कोटी निधी.

- राज्याच्या सर्वसामान्य जनतेचे साधन असलेल्या बसगाड्या, बस स्थानकांच्या दुरुस्तीसाठी रु.१४१ कोटी.
- बांधकामाधीन रेल्वे प्रकल्पांसाठी रु.६८.६० कोटी.
- विमानतळांच्या विकासाकरिता रु. ९१ कोटी.
- मिहान प्रकल्पाकरिता भूसंपादन व पुनर्वसन यासाठी रु. २०० कोटी.

❖ **उद्योग व पर्यटन**

- सामूहिक प्रोत्साहन योजनेसाठी रु. ३,१५० कोटी.
- यंत्रमागधारकांना वीज दरात सवलतीसाठी रु.१२३२.५३ कोटी.
- संरक्षित किल्ल्यांचे जतन व संरक्षणासाठी रु. ५० कोटी.
- वनातील निसर्ग पर्यटन विकसित करणे तसेच जैविक विविधतेचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना.
- राज्यातील पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांसाठी मार्गस्थ सुविधा उपलब्ध करण्यासाठी रु. ५० कोटी.
- ताडोबा-आंधारी व्याघ्र प्रकल्प, गोरेवाडा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांच्या विकासासाठी रु. १०० कोटी.
- प्रत्येक जिल्ह्यात "उत्तमराव पाटील वन उद्यान" निर्मिती.

❖ **वने**

- महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळ स्थापण्याची घोषणा.
- अधिसूचित वन्यजीव अभयारण्याबाहेर लोकसहभागातून वन वृक्षाच्छादन वाढविणे व वृक्ष संपत्तीचे व्यवस्थापन करणे यासाठी "श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना" या नवीन योजनेची घोषणा.

❖ **कौशल्य विकास**

- योजनांचे मूल्यमापन व आवश्यकतेनुसार एकत्रीकरण करुन कौशल्य विकास व स्वयंरोजगार सहाय्यासाठी " प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना " या नवीन योजनेची घोषणा.
- सेवाग्राम जिल्हा वर्धा येथे ग्रामोद्योग, कुटीरोद्योग व हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी संसाधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना.

❖ **शिक्षण, आरोग्य, महिला विकास**

- मुलींच्या वसतीगृहासाठी रु. ११२.५० कोटी निधी.
- येत्या ३ वर्षात राज्यातील मुलींच्या शासकीय वसतिगृहांना संरक्षित भिंती बांधण्याचा शासनाचा निर्धार.
- सर्व शिक्षा अभियानासाठी रु. १६९०.५६ कोटी.
- राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी रु.१९९६.४८ कोटी.
- राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी रु.१९९६.४८ कोटी.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी रु. ३०० कोटी.
- महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी राज्य स्तरावर कायमस्वरुपी "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ" निर्माण करण्याचा शासनाचा मानस.

❖ **अल्पसंख्यांक, विशेष सहाय्य व आदिवासी विकास**

- मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाला रु.१५० कोटीचे भागभांडवली अंशदान.
- विशेष सहाय्य योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या योजनांसाठी रु.१४५१.५० कोटी.
- अनुसूचित जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती उपयोजनेसाठी रु.६४९० कोटी.
- आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेसाठी रु.५१७० कोटी.

❖ **पोलीस व न्यायालये**

- अमरावती, औरंगाबाद, नाशिक व नागपूर शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा मनोदय.
- प्रत्येक जिल्ह्यामध्ये सायबर क्राईम लॅबची स्थापना.
- न्यायालयीन इमारती व न्यायाधिशांसाठी निवासस्थाने यासाठी रु. ४१३.६० कोटी.

❖ **प्रशासनाचे बळकटीकरण**

- एव्हिडन्स बेस्ड फोटोग्राफीद्वारे (Evidence Based Photography) योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष.
- राज्याच्या उत्पन्नाचे नवीन स्त्रोत तसेच खर्चामध्ये बचतीच्या अभिनव उपाययोजना सुचविणाऱ्या कल्पक शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहन .

* * * * *